मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# रेल्वेचा अपघात अन् प्रवाशांची धावपळ; तत्परतेने यंत्रणा लागल्या कामाला

## बेगडेवाडी स्थानकाजवळ पेरांबूर-प्रयागराज कुंभ एक्स्प्रेसचे दोन डबे घसरले : काही प्रवासी मृत्युमुखी



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-लोणावळा मार्गावरील बेगडेवाडी रेल्वे स्थानकाजवळ पेरांबूर-प्रयागराज कुंभ एक्स्प्रेसचे दोन डब्बे रेल्वे रुळावरून घसरून अपघात झाला आहे. यामध्ये काही प्रवाशांचा मृत्यू झाला असून, अनेकजण गंभीर जखमी झाले असल्याचा दूरध्वनी सकाळी पुणे रेल्वेच्या नियंत्रण कक्षात धडकला. त्यानंतर सर्वच यंत्रणा कामाला लागल्या.

तातडीने 'मेडिकल रिलीफ व्हॅन' घटनास्थळाकडे रवाना झाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांसह स्थानिक अधिकारी घटनास्थळावर पोचले. त्यावेळी रेल्वे प्रशासनाकडून हे सर्व मॉकड्रिल असल्याचे जाहीर केल्यानंतर सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

लोणावळा रेल्वे मार्गावर पेरांबूर-प्रयागराज कुंभ एक्स्प्रेसचे डबे रुळावरून खाली घसरल्याचा फोन पुणे रेल्वे नियंत्रण कक्षात सकाळी नऊ वाजून २० मिनिटांनी आला. त्यानंतर तत्काळ पुण्यातील मेडिकल रिलीफ व्हॅनला (एआरएमई) कळविण्यात आले. तसेच पुणे रेल्वे विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांना अपघाताची माहिती देण्यात आली.

अपघातामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून 'ओएचई'चा वीजपुरवठा बंद करण्यात आला. पुण्याची 'मेडिकल रिलीफ व्हॅन' घटनास्थळाकडे रवाना झाली. स्थानिक रेल्वे स्थानक प्रबंधक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले.

सर्वजण अलर्ट असल्याचे लक्षात आल्यानंतर गाड्यांच्या वेळापत्रकांवर कोणताही परिणाम होऊ नये, म्हणून सकाळी ९ वाजून ४० मिनिटांनी हे सर्व मॉकड्रील असल्याचे जाहीर करण्यात आले. धावपळ उडालेल्या सर्व रेल्वे अधिकाऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

या मॉकड्रिलमध्ये सर्व सुरक्षाविषयक गोष्टी व्यवस्थित असल्याचे दिसून आले. मदत आणि बचाव कार्यादरम्यान, एनडीआरएफ कमांडंट एस. बी. सिंग, डेप्युटी कमांडंट प्रवीण धस, वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता शादाब जमाल आणि विजयसिंह दडस, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता नारायण माहेश्वरी, वरिष्ठ विभागीय अभियंता मनीष सिंह, वरिष्ठ विभागीय सुरक्षा अधिकारी राजेंद्रकुमार कथल, पुणे रेल्वे रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी एन.के. संजीव, वरिष्ठ विभागीय

व्यावसायिक व्यवस्थापक डॉ. मिलिंद हिरवे, सहाय्यक विभागीय सुरक्षा अधिकारी दिलीप तायडे आदी उपस्थित होते.

# आकुर्डी रेल्वे स्टेशन येथे 'बोगी-वोगी' रेस्टॉरंटचा शुभारंभ

## रेल्वे प्रवाशांसह सर्वसामान्य नागरिकांसाठीही 24 तास खुले राहणार रेस्टॉरंट



**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्रीय रेल्वे बोर्डच्या 'रेस्टॉरंट ऑन व्हील्स' या संकल्पनेंतर्गत आकुर्डी रेल्वे स्टेशन याठिकाणी 'बोगी – वोगी' रेस्टॉरंटच्या दुसऱ्या शाखेचा शुभारंभ करण्यात आला आहे. या रेस्टॉरंटची पहिली शाखा मुंबई याठिकाणी आहे. हे रेस्टॉरंट वापरातून काढून टाकलेल्या रेल्वे डब्यात तयार केले असल्याने ज्याला बोगी वोगी, असे नाव देण्यात आले आहे.


या 'बोगी – वोगी' रेस्टॉरंटचे उदघाटन शुक्रवारी (दि.२० डिसेंबर) प्रसिद्ध सिने दिग्दर्शक दिगपाल लांजेकर, सिने अभिनेते अजय पुरकर आणि गायक अवधूत गांधी यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटनप्रसंगी संचालक नितीन चौगुले, मनिषसिंह तोमर, स्नेहा चौगुले, आर्किटेक्चर मंदार पोकळे, राजेंद्र चव्हाण, किरण पाटील, महेश यादव आदी उपस्थित होते.

या रेस्टॉरंटमध्ये ४४ जणांना बसण्याची सोय असून प्रवाशांना शाकाहारी आणि मांसाहारी असा दोन्ही जेवणांचा आस्वाद घेता येतो. त्याचबरोबर चहा, कॉफी, मॉकटेल, नाश्ता, साऊथ इंडियन, चायनीज या खाद्यपदार्थांचा आस्वादही रेल्वे प्रवाशांना घेता येणार आहे. मुंबईतील 'रेस्टॉरंट ऑन व्हील्स' सुरू झाल्यापासून आजतागायत हजारो प्रवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत यामधील खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतला आहे. या पार्श्वभूमीवर आकुर्डी रेल्वे स्टेशन येथे हे 'बोगी – वोगी' रेस्टॉरंट सुरु करण्यात आले असल्याची माहिती संचालक नितीन चौगुले यांनी यावेळी दिली.

आर्किटेक्चर मंदार पोकळे यांच्या संकल्पनेतून सदर 'बोगी – वोगी' या 'रेस्टॉरंट ऑन व्हील्स'ची उत्तमरीत्या रंगरंगोटी केली गेली असून आतमध्ये अतिशय सुंदररित्या आसनव्यवस्था, डेकोरेशन करण्यात आली आहे.

# नववर्षाच्या स्वागतास पर्यटननगरी सज्ज; हॉटेल्स बुकिंग जोरात

## नाताळच्या सुट्ट्या आणि 'थर्टी फर्स्ट' पार्श्वभूमीवर लोणावळ्यात पर्यटकांची गर्दी



**पिंपरी | प्रतिनिधी**

नाताळच्या सुट्ट्या आणि 'थर्टी फर्स्ट' पार्श्वभूमीवर लोणावळा शहर परिसरात पर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. लोणावळा-खंडाळ्यातील हॉटेल्स, रिसॉर्टसच्या बुकिंगला पर्यटकांचा जोरदार प्रतिसाद लाभत आहे. अनेक सेकंडहोम हाउसफुल झाले असून नाताळलाच हॉटेल्सचे बुकिंग सरासरी साठ ते सत्तर टक्क्यांपर्यंत झाले आहे. त्यामुळे थर्टी फर्स्टला हॉटेल्स, रिसॉर्टस फुल होतील अशी आशा आहे.

वीकेंडला पर्यटकांची चांगली पसंती मिळाली. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर कार्ला येथील एमटीडीसीचे बुकिंग फुल्ल झाले आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याचे माहिती कार्ला एमटीडीसीचे व्यवस्थापक विनायक काळे यांनी दिली.

### पर्यटकांनी खबरदारी घ्यावी

पर्यटक पाण्यात बुडून मृत्युमुखी पडण्याच्या तसेच वाहनांच्या अपघाताच्या घटना वाढत आहे. गेल्या महिन्यात नौकाविहार करताना दोघा तरुणांचा पवना धरणात बुडाल्याने मृत्यू झाला. कुंडमळा, कासारसाई, भुशी धरण येथेही दुर्दैवी घटना घडल्या आहेत. सुट्ट्यांची मजा लुटताना उत्साहाला आवर घालत खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

> खासगी बंगले, रिसॉर्टस, हॉटेल्स व्यावसायिकांनी नियमानुसार आवश्यक परवानग्या घेऊन व्यवसाय करावेत. नाताळ, नववर्षाचे स्वागत करताना नियमांचे उल्लंघन करू नये; अन्यथा कारवाई केली जाईल.
>
> - सुहास जगताप, पोलिस निरीक्षक, लोणावळा शहर.

# जगाला हेवा वाटेल असे संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ उभारा

## परिसरात अधिकाधिक वृक्षारोपण करावे : उपमुख्यमंत्री अजित पवारांचे आदेश





**पुणे | प्रतिनिधी**

श्री क्षेत्र तुळापूर येथील स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ प्राचीन आणि आधुनिकतेचा संगम साधून महाराजांचा गौरवशाली इतिहास जगासमोर येईल तसेच जगाला हेवा वाटेल अशा स्वरूपात उभारण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे तुळापूर (ता. हवेली) येथील बलिदान स्थळ विकास कामांची त्यांनी पाहणी केली. याप्रसंगी आमदार ज्ञानेश्वर कटके, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर, कार्यकारी अभियंता अमोल पवार, तुळापूरच्या सरपंच ॲड. गुंफा इंगळे, वढू बुद्रुकच्या सरपंच अंजली शिंदे आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ विकासकामे करताना ऐतिहासिक दृश्यस्वरुपातील आणि दर्जेदार साहित्याचा वापर करावा. विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याकडे लक्ष द्यावे. कोणतीही कामे प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. विकासकामे करताना दगडी कातीव, कोरीव बांधकाम, मातीच्या वैविध्यपूर्ण विटा आदींचा वापर करत बांधकामाला मजबुती येईल अशा पद्धतींचा अवलंब करावा.

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ व समाधी स्थळ स्मारक वढू (बु.) विकास आराखडा अंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील एकूण २६४ कोटी रुपयाच्या कामाबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास शासनस्तरावर बैठक घेऊन त्वरित मंजूरी देण्यात येईल. या कामांचे सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढण्याची कार्यवाही करावी.

नदीच्या कडेला बांधकाम करताना नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला कोणताही बाधा येणार नाही यासाठी सर्व पर्यावरणाच्या नियमांचे पालन करावे; तसेच नदीच्या अनुषंगाने लाल रेषा, निळी रेषाबाबतच्या अटींचे काटेकोर पालन करावे. परिसरात अधिकाधिक वृक्षारोपण करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

यावेळी पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळ वढू बु. (ता. शिरुर) स्मारक विकास आराखड्याबाबत माहिती घेतली तसेच अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

# गृहमंत्री अमित शहा यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा

## पिंपरी-चिंचवड शहर काँग्रेसकडून मागणी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक चौक, पिंपरी येथे निषेध आंदोलन




**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी भर संसदेत आक्षेपार्ह विधान करून त्यांचा घोर अपमान केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी केलेल्या विधानावरून काँग्रेस पक्षाने गृहमंत्री अमित शाह यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी केलेली आहे.

याअनुषंगाने आज मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक चौक, पिंपरी येथे पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) कॉंग्रेस कमिटीच्या वतीने शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गृहमंत्री अमित शाह यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी करत निषेध आंदोलन करण्यात आले. तसेच याबाबतचे निवेदन पिंपरी चिंचवडचे अप्पर तहसीलदार देशमुख यांना देण्यात आले.

त्याप्रसंगी ज्येष्ठ नेत्या शामलाताई सोनावणे, भाऊसाहेब मुगुटमल, माजी नगरसेवक तुकाराम भोंडवे, पर्यावरण विभाग महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अमरसिंग नाणेकर, सामाजिक न्याय विभाग प्रदेश उपाध्यक्ष वाहब शेख, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, सेवादल अध्यक्ष प्रा. ॲड. किरण खाजेकर, ओबीसी सेल अध्यक्ष सोमनाथ शेळके, अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष शहाबुद्दीन शेख, अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष हिरामण खवळे, व्यापारी सेल अध्यक्ष अमरजितसिंग पाथीवाल, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष ॲड. अशोक धायगुडे, वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. अनिरुद्ध कांबळे, मयूर जयस्वाल, बाबासाहेब बनसोडे, सचिन कोंढरे पाटील, मुन्साफ खान, बाबा आलम शेख, रशिद मंहम्मद अत्तार, अर्चना राऊत, वैशाली पवार, याकुब इनामदार, वसंत वावरे, एम आर पाल, ॲड. अनिकेत रसाळ, मिलिंद फडतरे, मकरध्वज वयादव, संदेश बोर्डे, सतिश भोसले, आण्णा कसबे, गौतम ओव्हाळ, साजिद खान, सचिन गायकवाड, रवि कांबळे, फिरोज तांबोळी, भास्कर नारखडे, गुंगा क्षीरसागर, पांडुरंग जगताप, विशाल शेलार, गणेश शेलार, सोनू शेख, सुरज कोथिंबीरे, दिपक जाधव, शेषराव दुधमल, भाऊसाहेब पठारे, साहेबराव थोरात आदी काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापालिकेचे ई-रिक्षाला 30 हजाराचे अनुदान

## पहिल्या 1500 रिक्षाधारकांना मिळणार लाभ : आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील वायू प्रदूषण कमी करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच ई-वाहन वापर धोरणाला चालना देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ई वाहन धोरणाअंतर्गत महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते ई रिक्षाधारकांना अनुदान धनादेश देण्यात आला. शहरातील जास्तीत जास्त ई-रिक्षाधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.



महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक धोरण २०२१' राबविण्याबाबत मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने शहरातील वायू प्रदूषण कमी करणे तसेच ई-वाहन धोरणाला चालना देणे, ई-वाहन वापरण्यासाठी लोकांना प्रोत्साहन देणे यासाठी महापालिकेच्या वतीने ई रिक्षाधारकांना अनुदान देण्यात येत आहे. त्यानिमित्ताने आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे स्थायी समिती सभागृह येथे ई-रिक्षा धारकांना धनादेश वितरण करण्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते ई रिक्षाधारकांना प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वित्त संचालक प्रवीण जैन, आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे, मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले, सह शहर अभियंता संजय खाबडे, बाबासाहेब गलबले, प्रमोद ओंभासे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या ई वाहन धोरणाअंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील आणि पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नोंद असलेल्या सुमारे १ हजार पाचशे ई रिक्षाधारकांना प्रत्येकी ३० हजार रुपये अनुदान देण्यात येत असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

### वायु प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेचे महत्वपूर्ण

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी एक महत्वपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत, जास्तीत जास्त ईव्ही बॅटरी (L5M) इलेक्ट्रिक तीनचाकी प्रवासी वाहतूक वाहन (श्री व्हिलर पॅसेंजर टी.आर.) तसेच ईव्ही बॅटरी मालवाहतूक (L5N) तीन चाकी माल वाहतूक वाहन (श्री व्हिलर गुड्स कॅरिअर टी.आर.) यांचा वापर करून शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**अनुदान योजनेची वैशिष्ट्ये**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी २३ जुलै २०२२ नंतर खरेदी केलेल्या ई-रिक्षा वाहनांसाठी महानगरपालिकेतर्फे ३०,००० रुपयांचे अर्थसहाय्य अनुदान दिले जाणार आहे.

प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर १५०० ई- खरेदी करणाऱ्या नागरिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

याशिवाय, पारंपरिक इंधनावर चालणाऱ्या पॅसेंजर आणि मालवाहतूक वाहनांचे ईव्ही बॅटरीमध्ये रूपांतर (रेट्रोफिटिंग) केल्यास अशा वाहनधारकांनाही अनुदान दिले जाणार आहे.

आज झालेल्या कार्यक्रमात सुधीर चांदेकर, जयदेव तायडे, निलेश काळे, मुर्तजा शेख, संदीप वाघ , भोलानाथ निजामपूरकर या पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश वितरीत करण्यात आले.

# शिवाजीनगर बस स्थानकाबाबत प्रवाशांसाठी खुशखबर!

## शिवाजीनगर येथील नवीन बस स्थानक सर्व सोयी सुविधांनी आणि अत्याधुनिक संकल्पनेनुसार साकारण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

शिवाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे (एसटी) नवीन बस स्थानक सर्व सोयी सुविधांनी आणि अत्याधुनिक संकल्पनेनुसार साकारण्यात येणार आहे. याठिकाणी बहुद्देशीय वाहतूक केंद्रासाठी (मल्टी मोडेल हब) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि महामेट्रो यांच्यात लवकरच सामंजस्य करार करण्यात येणार आहे. त्यानुसार सार्वजनिक, खासगी आणि भागीदारी (पीपीपी) तत्वानुसार महामेट्रो संपूर्ण वाहतुकीच्या दळवळणाला अनुसरून हे केंद्र बनविण्यात येणार आहे.



गेल्या तीन ते चार वर्षापासून शिवाजीनगर येथील बहुद्देशीय वाहतूक केंद्राचे काम रखडले होते. त्या पार्श्वभूमीवर आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी या प्रकल्पाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली होती. त्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार सोमवारी शिवाजीनगर येथील मेट्रोच्या स्थानकाबद्दल आणि 'एसटी'महामंडळाच्या बस स्थानकासंदर्भाच्या कामकाजाची आढावा बैठक घेतली. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

पवार यांनी यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी संपर्क साधून महामंडळ आणि महामेट्रो यांच्यामध्ये संयुक्त विकासासाठी सामंजस्य करार करण्यासंदर्भात संपर्क साधून चर्चा केली. त्यानंतर सचिवांना तातडीने या कामासंदर्भात करार करून निविदा प्रक्रिया राबवून तातडीने काम सुरु करावे, अशा सूचना केल्या.

### का झाला विलंब ?

» महामेट्रोच्या भूमिगत स्थानकाच्या बांधकामासाठी शिवाजीनगर येथील बस स्थानक तात्पुरत्या स्वरूपात वाकडेवाडी स्थलांतरीत करण्यात आले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात या स्थानकाच्या ठिकाणी बहुद्देशीय केंद्राबाबत वारंवार निर्णय बदलण्यात आले. त्यामुळे महामेट्रो आणि एसटी महामंडळाच्या स्थानकात या सर्व सोयी सुविधांचा बृहत आराखडा बनविताना महामंडळ आणि महामेट्रोच्या आराखड्यात एकवाक्यता होत नसल्याने हे काम रखडले होते.

### प्रवाशांना सुविधा मिळणार

» शिवाजीनगर येथील बहुद्देशीय वाहतूक केंद्रासाठी महामेट्रो आणि एसटी महामंडळासोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे. त्यानुसार आराखडा तयार करण्यात येणार असून प्रवाशांना आधुनिक सोयी सुविधांना अनुसरून गोष्टीचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच वातानुकलीत प्रतिक्षा कक्ष, बैठक व्यवस्था आणि इतर वस्तु खरेदीसाठी केंद्र आदी सुविधांचा लाभ घेता येणार असून एसटीच्या प्रवाशांना याचा चांगला फायदा होणार आहे.

# बारामतीला देशात क्रमांक एकवर नेणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही : बारामतीकरांकडून नागरी सत्कार

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीकरांनी लाखाहून अधिक मताधिक्याने मला निवडून दिल्याने माझी जबाबदारी वाढली आहे. त्यामुळे गेल्या सात टर्मला झाली नाहीत एवढी विकासकामे आठव्या टर्ममध्ये करून बारामतीला देशात क्रमांक एकचे स्थान मिळवून देणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



बारामती शहर-तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आयोजित नागरी सत्कार समारंभात ते बोलत होते. खा. सुनेत्रा पवार, आ. अमोल मिटकरी, पार्थ पवार, दिगंबर दुर्गाडे, सुरेश पालवे, किरण गुजर, सचिन सातव, संभाजी होळकर, राजवर्धन शिंदे, जय पाटील, अनिता गायकवाड, ज्योती लडकत, पुरुषोत्तम जगताप, केशवराव जगताप, सुनील पवार, पोपटराव गावडे, विक्रम भोसले आदी या वेळी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, राज्यासह बारामतीकरांनी लोकसभेला झटका दिल्याने माझ्यासह कार्यकर्ते सुद्धा चिंतेत होतो. परंतु, आम्ही ईव्हीएमला दोष न देता नव्या जोमाने कामाला लागलो. काही योजना आणल्या. मतदारांपुढे व्हीजन मांडले. त्यामुळे विधानसभेला महायुतीला न भूतो न भविष्यती यश मिळाले. त्यात लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे.

हा निकाल महाविकास आघाडीला पचलेला नाही. त्यामुळे ते ईव्हीएमवर टीका करीत आंदोलन करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा ईव्हीएमवर शंका घेणे अयोग्य असल्याचे स्पष्ट केले आहे. केवळ कार्यकर्त्यांना बरे वाटावे म्हणून मविआ आंदोलन करीत आहे. काँग्रेस एकसंघ असताना आणि विरोधी पक्ष कमकुवत असताना राज्याच्या स्थापनेपासून आजवर असे यश मिळाले नव्हते.

यंदाही बारामतीकरांनी लाखाहून अधिक मताधिक्य दिल्याने आता जबाबदारी वाढली आहे. बारामतीच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. मंत्रिमंडळात अर्थ आणि उत्पादन शुल्क अशी खाती मिळाली आहेत. त्याला योग्य न्याय देऊ. येत्या 3 मार्चला अर्थसंकल्प सादर करताना राज्याची आर्थिक शिस्त बिघडू न देता जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

तीन हत्ती चौकातील पाहणीबाबत त्यांनी नाव न घेता खा. सुळे यांना टोला लगावला. यापुढे विकासकामे करताना बुथ कमिट्यांना विचारूनच केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. बारामतीच्या विकासाचे व्हीजन त्यांनी उपस्थितांसमोर मांडले. केंद्राकडून 3 कोटी घरांची योजना राबवली जाणार असून त्यातील 10 टक्के घरे राज्याला मिळावीत यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र, राज्य, जिल्हा परिषद, नियोजन मंडळ आदींच्या माध्यमातून मोठा निधी आणून अनेक प्रकल्प मार्गी लावत पुढील पाच वर्षांत बारामतीला देशात क्रमांक एकचे स्थान मिळवून देणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

### धमक नसेल तर कामे घेऊ नका

» बारामतीत मधल्या काळात मलिदा गँग असा शब्दप्रयोग करून नाव खराब करण्याचे काम झाले. आपल्यातील काही मंडळी स्वतः कामे घेतात आणि ती दुस-यांना विकतात. त्यांनी कृपा करून हे धंदे बंद करावेत. तुमच्यात धमक व ताकद असेल तरच कामे घ्या. पारदर्शकतेला प्राधान्य द्या, असे आवाहन अजित पवार यांनी केले.

### विचारधारा सोडणार नाही

» महायुतीत आम्ही सहभागी असलो तरी पक्ष आपली विचारधारा सोडणार नाही. ध्येयधोरणे, विचारधारेशी प्रतारणा करणार नाही. उलट सहभागी पक्षांनाही महापुरुषांच्या विचारधारेने काम करायला लावू असे अजित पवार म्हणाले.

# पिंपळवंडीच्या तोतर बेट मळ्यात बिबट्या पकडला

## शेवगा, कांदा, बटाटा, मटारच्या भावात घसरण : उर्वरित फळभाज्या स्थिर

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथील तोतर मळ्यातील वसंत विठ्ठल ठोकले यांच्या शेतामध्ये बिबट्याला पकडण्यासाठी वन खात्याने लावलेल्या पिंजऱ्यात मंगळवारी (दि. २४) बिबट्या अडकल्याची माहिती ओतूर विभागाचे वनक्षेत्रपाल लहू ठोकळ यांनी दिली. पकडलेला बिबट्या सुमारे तीन वर्षांचा असून त्याला माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात ठेवण्यात आले आहे.



ठोकळ म्हणाले की, तोतरबेट येथील प्रवीण पंढरीनाथ काकडे या स्थानिक शेतकऱ्याने परिसरामध्ये बिबट्या असल्याचे वनविभागाला कळविले होते. तसेच बाजूला शाळा असल्यामुळे व दररोज सायंकाळी बिबट्या या ठिकाणाहून ये-जा करीत असल्याचे आम्ही स्वतः पाहिले असल्याचे त्यांनी सांगितल्याने वनविभाग आणि त्या ठिकाणी तातडीने तीन दिवसांपूर्वी पिंजरा लावला होता.

या पिंजऱ्यामध्ये बिबट्याला भक्ष म्हणून कोंबडी देखील ठेवण्यात आली होती. मंगळवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास हा बिबट्या पिंजऱ्यामध्ये अडकला असून त्याला माणिकडोह येथील निवारा केंद्रात हालविण्यात आले आहे.

दरम्यान या परिसरामध्ये अद्यापही चार ते पाच बिबटे असून ओळख हाताने पुन्हा या ठिकाणी पिंजरा लावावा अशी मागणी स्थानिक नागरिकांची आहे. तसेच पकडलेले बिबटे इतरत्र सोडून न देता या बिबट्यांची नसबंदी करावी: अन्यथा हे सगळे बिबटे ताडोबा सारख्या जंगलामध्ये नेऊन ठेवावेत अशी मागणी प्रवीण पंढरीनाथ काकडे यांनी केली आहे.

वनक्षेत्रपाल लहू ठोकळ म्हणाले की, या परिसरामध्ये जर बिबट्या अद्यापही असेल तर पुन्हा वनविभाग येथे पिंजरा लावील. सध्या उसाची तोडणी सुरू असल्याने बिबट्या इतरत्र सैरभैर झाल्याचे दिसून येत आहे. शाळकरी मुलांबरोबर शेतामध्ये काम करत असलेल्या लोकांनी याबाबतची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.